


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२४, बुधवार २२ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कोर्टबाजी आणि १९९१ ची पुनरावृत्ती होणार का ?



दक्षिण नगर लोकसभा निवडणुकीत कोण विजयी अथवा पराभूत हे मतपेटीद्वारे ४ जुनला जाहिर होईल. लंके अथवा विखे कोणी जिंकले तरी या निवडणूकीच्या निकालाला न्यायालयात आव्हान दिले जाईल अशीच या निवडणूक काळातील छुपी रणनिती असावी. म्हणूनच निवडणूक आयोगाकडे उभयपक्षाकडून तक्रारी करून कागदोपत्री पुर्व तयारी केल्याचे दिसते.

विखे विजयी झाले तरी लंके कोर्टात जातीलच आणि लंके जिंकले तर हा पराभव विखे पचवू शकणार नाहीत. ते कोर्टात आव्हान देतील असाच निकालापुर्व कयास बांधण्यास हरकत नसावी. कोर्टबाजीच्या माध्यमातून १९९१ च्या निवडणूकीची पुनरावृत्ती होणार असाच प्राथमिक रागरंग जाणवतो. आता कोर्टबाजीच्या माध्यमातून लंकेंच्या आडून पवार-विखे राजकीय नाटयाचा दुसरा अंक सुरू होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सन १९९१ ला विखेंनी कोर्टबाजीचा खेळ सुरू केला, त्याला तब्बल ३३ वर्षांनी पवार हे प्रत्युत्तर देण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तेंव्हा हा १९९१ चा राजकीय इतिहास पहिल्यांदा समजून घेण्याची गरज आहे. दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघात १९९१ ला काँग्रेसचे यशवंतराव गडाख विरूध्द बाळासाहेब विखे अशी लढत झाली होती. निवडणूकीच्या काळात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाल्याने निवडणूक प्रक्रीया लांबवली गेली. सुमारे दहा पंधरा दिवसानंतर मतदान पार पडले. दरम्यानच्या काळात सहानुभूतीची लाट निर्माण होउन काँग्रेसचे यशवंतराव गडाख विजयी होऊन बाळासाहेब विखे पराभूत झाले. बाळासाहेब विखे यांनी गडाख यांच्या विजयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले. त्यांनी याचिकेत निवडणूक काळात भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला, विखे यांचे चिन्ह सायकल तर अपक्ष उमेदवार देशमुख यांचे चिन्ह मोटारसायकल होते. यास साम्य असलेल्या चिन्हांमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला.सायकलची मते मोटारसायकलला गेली, निवडणूक काळात दहशतीचे वातावरण तयार झाले. अशी अनेक कारणे याचिकेच्या कैफियतमये देण्यात आली होती. या निवडणूक आव्हान याचिकेची सुनावणी तत्कालीन न्यायमुर्ती हळबे साहेब यांच्या बेंचपुढे झाली. विखेंचे वकील ॲड. आठरे आणि ॲड. म्हसे तर ॲड. तळेकर हे गडाखांचे वकील होते.

या खटल्यामध्ये पत्रकारांच्या साक्षी होत्या. त्या मी, (रामदास ढमाले




) प्रमुख साक्षीदार होतो. माझी साक्ष तब्बल तीन दिवस चालू होती. त्यासंदर्भातील पडद्याआडच्या अनेक घडामोडी आहेत. त्या इथे नमुद करणे प्रशस्त ठरणार नाही.

न्यायालयाचा निकाल लागला तो धक्कादायक होता. यशवंतराव गडाख यांची खासदारकी रद्द करून न्यायालयाने बाळासाहेब विखे यांना विजयी घोषीत केले. त्याची कारणमीमंसा न्यायालयायाने निकालपत्रात नमुद करून तत्कालीन मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते शरद पवार यांच्यावर ताशेरे ओढले. यशवंतराव गडाख यांची खासदारकी रद्द झाली, त्याबरोबरच त्यांना सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरविण्यात आले. त्यांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले. देशाच्या इतिहासात असा धक्कादायक निकाल पहिल्यांदाच जाहिर झाल्याने देशभर राजकीय खळबळ उडाली होती. पुढे या निकालाला सुप्रिम कोर्टात आव्हान देण्यात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने गडाखांची खासदारकी रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवला. पण बाळासाहेब विखे यांना विजयी घोषीत करण्याचा निकाल रद्द ठरविला गेला. त्यानंतर या मतदारसंघात पुन्हा पोटनिवडणूक झाली.

या खटल्यामुळे शरद पवार हे सुध्दा राजकीय दृष्टया प्रचंड अडचणीत आले होते. पण सुप्रिम कोर्टाने त्यांच्यावरील ताशेरे काढून टाकले. त्यानंतर निवडणूक आयुक्त म्हणून टी.एन. शेषन यांची नियुक्ती झाली. त्यांनी आज जी काटेकोर आचारसंहिता दिसते त्या आदर्श आचारसंहितेची सुरूवात नगर दक्षिण लोकसभा निवडणूकीच्या पोटनिवडणूकीपासून केली. त्यावरून सन १९९१ ची निवडणूक कशी ऐतिहासिक ठरली याचा कोणालाही अंदाज येउ शकतो.

सन १९९१ नंतर नगर दक्षिणची निवडणूक पाहिल्यांदाच राजकीयदृष्टया अत्यंत संवेदनशील आणि प्रतिष्ठेची झालेली दिसते. या दोन्ही निवडणूकीतील साम्य स्थळे सुध्दा प्रकर्षाने जाणवतात. चिन्हात सार्धम्य दिसते तसेच तुतारी आणि वाद्याचे चिन्ह आहे. भ्रष्ट मार्गाचा अवलंब झाल्याच्या उभय बाजूने निवडणूक आयोगाकडे तक्रारी झाल्या असून तसे रेकॉर्ड करून घेतल्याचे दिसते. दहशतवादाचे मुद्दे कमी अधिक फरकाने तसेच आहेत. त्या ९१ च्या निवडणूकीत नगर शहरातील गुंडगिरीचा मुद्दा ऐरणीवर आला. त्या निवडणूकीत जगताप-कोतकर विखेंचे प्रचारक होते. शरद पवार यांनी तोच धागा पकडून नगरच्या गांधी मैदानाच्या सभेत त्या गुंडगिरीचा नावानिशी उल्लेख केला होता. यावेळी सुध्दा विखेंच्या प्रचारात जगताप, कोतकर होतेच. पण शरद पवारांनी त्यांच्या कोणत्याच भाषणात त्या नावांचा उल्लेख केला नाही. कदाचित पवार साहेब सावध झाले असू शकतात.

१९९१ च्या निवडणुकीतील अनेक मुद्यांची तब्बल ३३ वर्षांनी पुनरावृत्ती जरूर झाली. पण त्याचा कोणीच तसा प्रपोगंडा केला नाही. १९९१ ला बाळासाहेब विखे यांना निवडणूक अत्यंत जड गेली. त्यात ते पराभूत झाले होते. पण त्यांनी अतिशय अटीतटीची झुंज दिली होती. यावेळी म्हणजे २०२४ मध्ये नीलेश लंके आणि भाजपाचे सुजय विखे यांच्यात चुरशीची लढत झाली. यावेळी विखे यांच्याकडे महायुतीतील विविध पक्षाचे राजकीय बळ आहे तर बाळासाहेब विखे यांच्याकडे जिल्हा विकास आघाडी या त्यांच्याच निष्ठावंत कार्यकर्त्यांचे बळ होते. ते प्रामाणिक, चिवट होते. ती स्थिती यावेळी नसून कोणतीच लाट अथवा सहानुभूती नसल्याने डॉ. सुजय विखे यांचा राजकीय कस लागणार आहे. त्याचे उत्तर ४ जुनला कळेल. तर नीलेश लंके मतदानानंतर स्वतःच्या विजयावर ठाम दिसतात परंतू त्यासाठी मतपेटी फुटण्याची प्रतिक्षा करावी लागेल.

## मी प्रमुख साक्षीदार

**उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील १९९१ च्या निवडणूक खटल्याने मी, (रामदास ढमाले ) तसा प्रमुख साक्षीदारांपैकी एक होतो. माझी साक्ष कोर्टापुढे तब्बल तीन दिवस चालू होती. १९९१ च्या काळात साधारणतः एक-दिड वर्षे मी दै. गांवकरीमध्ये होतो. माझी साक्ष दै. गांवकरीमध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांसदर्भात होती. खटला सुरू झाला त्याकाळात मी पुन्हा दै. लोकमतच्या सेवेत होतो. १९९१ मध्ये माझ्या ६ ते ८ बातम्या प्रचंड गाजल्या. त्या मी गांवकरीतून शरद पवार यांच्या जामखेड, नेवासा, नगर शहर येथील निवडणूक प्रचाराचे वार्तांकन केले होते. तर विखे यांच्या सोनई, श्रीगोंदा, काष्टी येथील रिपोर्टींग केले होते. त्यात माझी त्या काळातील खळबळजनक वार्तापत्रे होती. ही सर्व कात्रणे पुरावा म्हणून कोर्टात दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या खटल्याचा प्रमुख भाग असल्याने माझ्या साक्षीला महत्व प्राप्त झाले होते.**

# मळगंगा विश्वस्त मंडळाची प्रथमच निवडणूक होणार!

## ■ २ जुन रोजी मतदान ■ अर्ज दाखल करण्यास प्रारंभ

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मळगंगा देवस्थानच्या विश्वस्त मंडळाची प्रथमच निवडणूक होणार असून येत्या २ जुन रोजी विश्वस्त निवडीसाठी मतदान घेण्यात येणार आहे. निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाला आहे.**

सन २०२४ ते सन २०२९ या कालखंडासाठी विश्वस्तांची निवड करण्यात येणार आहे. गेल्या रविवारी विशेष सर्वसाधारण सभा होऊन या सभेमध्ये गुप्त मतदान घेऊन विश्वस्त निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे गेल्या ४०-४५ वर्षात प्रथमच या विश्वस्त संस्थेची निवडणूक होणार आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता कार्याध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांच्या सहीने निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आला. उर्वरीत पान ३ वर



### असा आहे निवडणूकीचा कार्यक्रम

दि. २१ ते २३ ते उमेदवारी अर्जांची विक्री, दि. २१ ते दि. २४ दुपारी २ पर्यंत उमेदवारी अर्ज स्विकारणे, दुपारनंतर उमेदवारांची यादी प्रसिध्दी, दि. २५ मे प्राप्त अर्जांची छानणी, दि. २५ मे रोजी विधीमान्य उमेदवारांची यादी प्रसिध्दी, दि. २६ मे ते २७ मे उमेदवारी अर्ज मागे घेणे. दि.२७ रोजी दुपारनंतर पात्र उमेदवारांना बोधचिन्ह वाटप, दि. २८ रोजी बोधचिन्हासह उमेदवारांची यादी प्रसिध्दी, दि. २ जुन रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पुष्कर लॉन्स येथे मतदान, व त्यानंतर मतमोजणी व निकाल घोषीत करण्यात येणार आहे.

### १ हजार १८१ मतदार

मळगंगा विकास ट्रस्टची सभासद संख्या १ हजार २१४ असून १ हजार १८१ सभासद मतदानासाठी पात्र आहे. ट्रस्टला राज्याचे कार्यक्षेत्र असले तरी गाव व परिसरातील सभासदांची संख्या मोठी आहे. कार्याध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार असून ट्रस्टचे व्यवस्थापक हे सहाययक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहे. निवडणूकीबाबतचे सर्वाधिकार ढवळे यांच्याकडे आहेत.

### वाढीव सभासद कळीचा मुद्दा !

**विश्वस्त मंडळाने वर्षभरात तीनशेपेक्षा जास्त सभासद वाढविले असून हाच या प्रक्रियेतील खरा कळीचा मुद्दा आहे. सभासद वाढीला विरोधी गट आज विरोध करीत असला तरी सभासद यादी जाहिर झाल्यानंतर त्यावर हरकत घेण्यासाठी संधी देण्यात आली होती. त्यावेळी कोणीही हरकत न घेतल्याने नव्याने करण्यात असलेले सभासद कायम झाले आहे. सचिव शांताराम कळसकर यांनी काही विश्वस्तांना अंधारात ठेऊन सभासदांमध्ये वाढ केल्याचा आरोपही करण्यात येत आहे.**

### १ हजार १८१ मतदार

मळगंगा विकास ट्रस्टची सभासद संख्या १ हजार २१४ असून १ हजार १८१ सभासद मतदानासाठी पात्र आहे. ट्रस्टला राज्याचे कार्यक्षेत्र असले तरी गाव व परिसरातील सभासदांची संख्या मोठी आहे. कार्याध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार असून ट्रस्टचे व्यवस्थापक हे सहाययक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहे. निवडणूकीबाबतचे सर्वाधिकार ढवळे यांच्याकडे आहेत.

# बारावीच्या परीक्षेत यंदाही मुलींचीच बाजी !

## राज्याचा निकाल ९३.३७ टक्के
## कोकण अव्वल तर मुंबई सर्वात कमी

**पुणे : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के लागला आहे. सर्वाधिक ९७.५१ टक्के निकाल कोकण विभागाचा, तर मुंबई विभागाचा सर्वांत कमी ९१.९५ टक्के निकाल लागला.**

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर या वेळी उपस्थित होते. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार



९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. राज्यातील ३ हजार ३२० केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.

यंदाच्या निकालात मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९२.६० टक्के मुलगे, तर ९५.४९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. यंदा निकाल उर्वरीत पान ३ वर

# टॅग नसलेल्या बैलांचा बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग नको

## बैलगाडा शर्यती संदर्भात नवीन नियमावली जाहीर



**पुणे : प्रतिनिधी**


**कानाला बिल्ला नसलेल्या बैलाला शर्यतीत भाग घेता येणार नाही. टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग घेण्यास परवानगी देऊ नये असे आदेश पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.**

केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने 'नॅशनल डिजिटल लाईव्हस्टॉक मिशन' ही भारत पशुधन प्रणाली आणली आहे. या प्रणालीनुसार जनावराच्या कानाला एक टॅग लावण्यात येतो. त्यात एक १२ अंकी बारकोड असतो.यामध्ये पशुची जन्म आणि मृत्यूची नोंद घेण्यात येते. रोग प्रतिबंधात्मक लसीकरण

उर्वरीत पान ३ वर

# ६ जूनपर्यंत आरक्षण द्या अन्यथा..

## मनोज जरांगे पाटलांचा इशारा
## आरक्षणाचा गुलालच आम्हाला आनंदाचा



**जालना : प्रतिनिधी**

**४ जूनला आम्ही उपोषण करणार आहोत. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी हे उपोषण करणार आहोत. ४ जूनला आंतरवली सराटीतून आम्ही उपोषण सुरु करणार आहोत.**

आम्हाला कोण पडलं, कोण निवडून आलं याचा आम्हाला आनंद नाही. आरक्षणाचा गुलाल आमच्यासाठी आमचा आनंद आहे. आम्हाला बाकी कशात आनंद नाही. ४ जूनची तारीख आम्ही साडेतीन महिन्यांपूर्वी जाहीर केली आहे. त्यात कुठलाही बदल होणार नाही. आमचं शांततेचं युद्ध आहे त्याच मार्गाने आम्ही आंदोलन करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

जरांगे पाटील पुढे म्हणाले की,मराठा आणि कुणबी एकच हा कायदा पारित करायचा, सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी करायची , ज्या केसेस मागे घ्यायच्या ठरल्या आहेत त्या मागे घ्यायच्या, शिंदे समितीचा कार्यकाळ एक वर्ष वाढवायचा या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. नवीन मागणी कुठलीही नाही. उर्वरीत पान ३ वर






फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# सुंदर मी होणार !

**प्रत्येक व्यक्तीला आपण सुंदर आणि आकर्षक दिसावं असं नेहमीच वाटत असतं. प्रत्येक व्यक्ती खरेतर जन्मतः सुंदरच असते. निसर्गाने प्रत्येकाला सुंदर केस, सुंदर त्वचा दिलेली असते. परंतु नंतर हळूहळू प्रदूषण, चिंता, कृत्रिम गोष्टींमुळे, चुकीच्या आहार-विहारामुळे नैसर्गिक सौंदर्य कमी कमी होत जाते. स्त्रिया एका वर्षात सुंदर दिसण्यासाठी किंवा सौंदर्याविषयी काही प्रयोग करण्यासाठी साधारणपणे ४०० तास खर्च करतात, असे एका सर्वेक्षणातून लक्षात आले आहे.**

प्रत्येक स्त्री सुंदर व आकर्षक दिसू शकते. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असेल तर सौंदर्य हे केवळ पांढऱ्या रंगावर (गोऱ्या रंगावर) अवलंबून नाही तर त्वचा किती निरोगी आहे त्यावर अवलंबून असते. केसांचे सौंदर्यसुद्धा केवळ लांबीवर अवलंबून नसते तर ते किती निरोगी, चमकदार आहेत यावर अवलंबून असते. स्त्रीचे वय कितीही असले तरी किंवा केसांचा -त्वचेचा रंग कसाही असला तरी ते निरोगी असतील तरच ते सौंदर्यात भर टाकतात. केस, त्वचा त्याचप्रमाणे इतर अवयवांची काळजी कशी घ्यावी याविषयी काही उपाय थोडक्यात पाहूया...

## त्वचा

चेहरा हा नेहमीच आपल्या अंतर्मनाचा आरसा असतो. आपण निरोगी असू तर त्याचे प्रतिबिंब आपल्या चेहऱ्यावर किंवा त्वचेवर लगेचच दिसून येते. सध्याच्या धावपळीच्या किंवा स्पर्धेच्या युगात आणि घरातील जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना स्वतःची काळजी घेण्यासाठी फारसा वेळच मिळत नाही. त्यामुळे काही वेळा लवकर फरक दिसावा याच्यासाठी स्वतःच्या मनानेच काही चुकीच्या सौंदर्य प्रसाधनांचा वापर केला जातो. (बाजारात सध्या अशाच काही स्टिरॉईडस् असलेल्या क्रीम मिळत आहेत) अशा चुकीच्या क्रीममुळे अतिशय वाईट दुष्परिणाम पहायला मिळतात.

## त्वचेविषयीच्या काही तक्रारी

- रुक्ष त्वचा
- तेलकट त्वचा
- त्वचेवर मुरुम, तारुण्यपिटिका
- त्वचा काळवंडणे, वांग येणे, चेहऱ्यावर खूप तीळ.
- सुरकुत्या
- निस्तेज त्वचा
- डोळ्यांभोवती काळी वर्तुळे

## रुक्ष त्वचा

त्वचेचा नैसर्गिक कोरडेपणा किंवा तेलटकपणा हा आपल्या त्वचेतील तैलग्रंथीवर अवलंबून असतो. ऊन, धूळ, प्रदूषण, तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधने यामुळे त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी होते आणि त्वचा रुक्ष आणि निस्तेज दिसू लागते. त्वचेतील पाण्याच्या प्रमाणावर त्याची कांती (ग्लो) अवलंबून असतो. जर त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी झाले तर त्वचा काळवंडल्यासारखी होते. वयोमानानुसार त्वचेतील कोलॅजिनचे प्रमाण कमी होते आणि त्यामुळेही त्वचा रुक्ष होते. अतिप्रमाणात साबणाच्या वापरामुळेही त्वचेला रुक्षता येते.



## रुक्ष त्वचेसाठी उपाय

- आंघोळीसाठी खूप गरम पाण्याचा वापर करू नये.
- साबणाने वारंवार चेहरा धुवू नये.
- तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधनांचा वापर टाळावा.
- चांगल्या प्रतिच्या मॉईश्चराईजरचा वापर करावा.
- आंघोळीनंतर खोबरेल तेलाचे तीन-चार थेंब पाण्यात मिक्स करून लावल्यानंतरही त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. खोबरेल तेलाप्रमाणेच बदाम तेल, कुंकुमादि तेलाचाही वापर करता येतो.
- अँटीऑक्सिडंट असणाऱ्या पदार्थांचा जेवणात वापर करावा. (उदा. आवळा, लिंबू, गाजर)
- ग्लिसरिनचा चांगला उपयोग कोरड्या त्वचेसाठी होतो. (एक चमचा ग्लिसरिन एक चमचा गुलाबजल एकत्र करून कोरड्या त्वचेवर लावणे.)
- कोरफड गर आंघोळीच्या आधी १० मिनिटे लावून ठेवून नंतर धुतल्यास त्वचेचा कोरडेपणा कमी होतो.
- तेलाप्रमाणेच काही फळांचाही वापर आपण पॅक म्हणून करू शकतो.
- अर्धे पिकलेले केळे कुस्करून घेणे. त्यात एक चमचा खोबरेल तेल एकत्र करून हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवावे आणि नंतर धुवून टाकावे.
- दोन चमचे बेसन पीठ, अर्धा चमचा आंबे हळद, १ चमचा मध, १ चमचा दुधाची साय, गुलाबपाणी एकत्र करून त्याची पेस्ट करून घ्यावी. ही पेस्ट पूर्ण चेहऱ्याला लावून २० मिनिटे ठेवून नंतर धुवून टाकावे. हा पॅक आठवड्यातून एकदा जरूर वापरावा.



# कोरफडीने खुलवा चेहऱ्याचे सौंदर्य

**हल्लीच्या या धकाधकीच्या दिवसांमध्ये मोबाईलला आणि अत्याधुनिक जीवनशैलीला जितकं महत्त्व दिलं जातं तितकं महत्त्व आपल्या आरोग्याला मात्र दिलं जात नाही. अनेकदा धकाधकीत आपण स्वतःकडे लक्ष देणं विसरतो. त्याचे परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यातून आपल्याला सहज दुसून येतात. जेवणाच्या वेळा, खात असलेले पदारथ, अपुरी झोप, प्रदूषण, ताण यांचा शरीरावर आणि मनावर होणारा परिणाम दिसून येतो. त्वचा हे परिणाम दाखविणारा महत्त्वाचा घटक आहे. शरीराचा अतिसंवेदनशील भाग असणाऱ्या त्वचेवरुनही एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचा अंदाज सहज लावणं शक्य होतं. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी जाहिरातींमध्ये दाखवल्याप्रमाणे महागड्या क्रिम किंवा सौंदर्यप्रसाधनांचा वापर करण्याची आवश्यकता नसते, तर घरगुती उपचारांनीही त्वचेच्या समस्या दूर होऊ शकतात. त्यासाठी योग्य गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. त्वचेचं सौंदर्य आणि आरोग्य हे दोन्ही चांगले ठेवायचे असेल तर कोरफड आणि हळद हे अतिशय उपयुक्त पदार्थ आहेत. पाहूयात हळद आणि कोरफडीचे त्वचेच्या दृष्टीने होणारे फायदे....**

- वाढणारे वय लपण्यास मदत : वाढत्या वयोमानानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येतात. या सुरकुत्या दिसू नयेत यासाठी ठराविक वयोगटातील महिला आणि पुरुष अनेक प्रयत्न करतात. मात्र त्याचा म्हणावा तितका फायदा होतो असे नाही. कोरफड आणि हळदीच्या वापरामुळे मात्र या सुरकुत्या कमी दिसण्यास मदत होते. १ टीस्पून नारळाचं तेल, १ टीस्पून कोरफडीचा गर आणि १ टीस्पून हळद या एकत्र करुन हा लेप चेहऱ्याला लावा. दोन मिनिटं हा लेप ठेवल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.
- त्वचेचे संसर्ग टाळण्यासाठी : खरुज आणि नायटा यांसारख्या त्वचारोगांवर उपचार म्हणूनही कोरफड आणि हळदीचा वापर होतो. ज्या ठिकाणी नायटा किंवा खरुजाची लागण झाली आहे तिथे हळद आणि कोरफडीचा लेप लावल्यास तो भाग लवकर बरा होतो. हळद आणि कोरफड यांच्यामध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मांमुळे हे शक्य होतं. हा लेप तयार करण्यासाठी चमचाभर नारळाचं तेल, कोरफडीचा गर आणि हळद घेऊन ही पेस्ट त्वचेवर साधारण अर्ध्या तासासाठी लावून ठेवा आणि त्यानंतर कोमट पाण्याने धुवा.
- मुरुमं नाहीशी करण्यासाठी : त्वचेच्या रंध्रांमध्ये प्रदूषणामुळे जिवजंतू शिरकाव करतात. त्यांचा नायनाट करून त्वचेचं सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी सुद्धा कोरफड आणि हळदीचा सर्रास केला जातो. यामुळे चेहऱ्यावर येणारी मुरुमं कमी होतात. चेहऱ्यावर लावण्यात येणारा हा लेप तयार करण्यासाठी एक चमचा हळद आणि कोरफडीचा गर आणि एक चमचा मध यांचं एकत्र मिश्रण करुन हे मिश्रण मुरुमं असणाऱ्या भागांवर साधारण पंधरा मिनिटांसाठी लावा आणि त्यानंतर चेहरा कोमट पाण्याने धुवा. काहीवेळा असे केल्यास मुरुमं कमी होण्यास मदत होते.



- त्वचेचा रुक्षपणा कमी करण्यासाठी : अनेकांची त्वचा कोरडी असते. अशांना हिवाळ्यात त्वचेची आग होण्याचा त्रास होते. पण त्वचेमध्ये असणाऱ्या पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्यासाठी कोरफड आणि हळद हे रामबाण उपाय ठरतात. ज्यासाठी १ टीस्पून हळद आणि कोरफडीचा गर आणि काकडीचा रस हे सर्व पदार्थ एकत्र करुन ही पेस्ट पंधरा ते वीस मिनिटं चेहऱ्यावर लावून ठेवावी आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवावा.

# कोरफड जेल रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवल्यास काय होते?

**आपलीही त्वचा नितळ, सुंदर आणि डागविरहित असावी, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. पण मुरुम, डाग इत्यादी समस्यांमुळे सौंदर्यामध्ये बाधा निर्माण होते. प्रदूषित वातावरण आणि बदलती जीवनशैली यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक नाहीशी होऊ लागते. त्वचेवर ग्लो येण्यासाठी काही जणी भरपूर प्रमाणात केमिकलयुक्त ब्युटी प्रोडक्ट्सचा वापर करतात. पण कित्येकदा या उत्पादनांमुळे चेहऱ्याचे नुकसान होते. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी नैसर्गिक घरगुती उपचार करण्यावर भर द्यावा. पण हे उपाय देखील डॉक्टरांचा सल्ला घेऊनच करावेत. कोरफड जेल हे सर्व प्रकारच्या त्वचेसाठी लाभदायक आहे. त्वचेची देखभाल करण्यासाठी हा सर्वात स्वस्त आणि मस्त उपाय आहे. कोरफड जेलमधील पोषण तत्त्वांमुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. कोरफडमध्ये हर्बल आणि औषधी गुणधर्मांचा साठा आहे. ज्यामुळे त्वचा आणि केसांशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. ॲलोव्हेरा जेल आपल्या त्वचेसाठी कसे लाभदायक ठरते? जाणून घेऊया याबाबतची सविस्तर माहिती...**

## चेहऱ्यावर ॲलोव्हेरा जेल लावण्याचे फायदे

कित्येक ब्युटी प्रोडक्टमध्ये ॲलोव्हेरा जेलचा वापर केला जातो. सौंदर्य प्रसाधनांप्रमाणेच कोरफडचा रस देखील चेहऱ्यासाठी लाभदायक आहे. या औषधी वनस्पतीमध्ये ७५ प्रकारचे घटक असतात. ज्यामध्ये मुख्यतः व्हिटॅमिन, खनिजे, सॅलिसिलिक ॲसिड, लिग्निन, सॅपोनिन यांचा समावेश असतो. केमिकलयुक्त प्रोडक्टमुळे होणारे दुष्परिणाम पाहता प्रत्येक जण आता आयुर्वेदिक, हर्बल उपचार करण्यावर भर देत आहेत. नैसर्गिक उपचारांमुळे चेहऱ्याला दीर्घ काळासाठी फायदे मिळतात आणि महत्त्वाचे म्हणजे डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपाय केल्यास दुष्परिणामही होत नाहीत.



- कोरफड आणि काकडी : काकडी व कोरफड एकत्र करून चेहरा आणि डोळ्यांच्या आसपास लावा. कोरफड जेल आणि काकडी मिक्सरमध्ये वाटून घ्या. यानंतर एका स्वच्छ कापडाच्या मदतीने काकडी - कोरफडचा रस बाउलमध्ये गाळून घ्या. हा रस तुम्ही कापसाच्या मदतीने आपल्या चेहऱ्यावर लावू शकता. याद्वारे तुमच्या त्वचेला व्हिटॅमिन ईचा पुरवठा होईल आणि त्वचा हायड्रेट राहण्यासही मदत मिळेल. हवे असल्यास तुम्ही व्हिटॅमिन ई तेलासह देखील कोरफड जेल मिक्स करू शकता. नियमित हे उपाय केल्यास चेहऱ्यावर सकारात्मक बदल पाहायला मिळतील.
- ॲलोव्हेरा फेस स्क्रब : कोरफड जेल आणि ग्राउंड ओटमील एकत्र घ्या. जाडसर मिश्रण तयार करा. नियमित या स्क्रबचा वापर करावा. ओटमील आपली त्वचा एक्सफोलिएट करण्याचं कार्य करते. तर कोरफडमुळे त्वचेला थंडावा मिळतो.
- चेहऱ्यासाठी ॲलोव्हेरा लेप : तुमच्या घरामध्ये कोरफडचे रोपटे असेल तर त्यातील ताजा गर काढून घ्या. यामध्ये ऑलिव्ह ऑइल किंवा नारळाचे तेल मिक्स करा. मिश्रण तयार झाल्यावर चेहऱ्यावर लावा. हेअर पॅक म्हणूनही याचा वापर होऊ शकतो.
- कोरफड जेल रात्रभर चेहऱ्याला लावण्याचे फायदे : आपल्या चेहऱ्यावर शुद्ध कोरफड जेलनं मसाज करा आणि रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवा. यातील पोषण तत्त्वांमुळे त्वचेला लाभ मिळतात. सर्वप्रथम फेस वॉशने आपला चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. कॉटनच्या कापडाने चेहरा पुसून घ्यावा. यानंतर कोरफड जेल चेहरा आणि मानेवर लावा. आवश्यकता वाटल्यास तुम्ही एसेंशियल ऑइलचाही वापर करू शकता. चेहऱ्याचा हलक्या हाताने मसाज करा आणि रात्रभर जेल चेहऱ्यावर राहू द्या. नियमित स्वरुपात हा उपाय केल्यास त्वचेवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. मुरुम, मुरुमांचे डाग देखील कमी होतात.

# मुलायम, घनदाट केसांसाठी कोरफडीचा वापर!

**एखाद्या चित्रपट किंवा जाहिरातीत अभिनेत्री आणि मॉडेलचे केस पाहून आपलेही केस असे असावेत, असे आपल्यापैकी अनेकांना वाटते. मात्र, काळ्याभोर घनदाट केसांसाठी नेमके काय करावे, हे माहीत नसते. सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या विविध शाम्पू आणि कंडिशनर्समध्ये केमिकलचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे केस खराब होण्याची शक्यता असते. या खराब झालेल्या केसांशी आणखी चुकीचे वागतो आणि त्यामुळे केसांचा पोत आणखीनच खराब होतो. अनेकदा पार्लरमध्ये जाऊन हजारो रुपये खर्च करूनही केस आपल्याला हवे तसे होत नाहीत. मात्र, केसांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी काही सोपे उपाय केल्यास निश्चितच फायदा होऊ शकतो. कोरफड ही उपयुक्त अशी औषधी वनस्पती आहे. त्वचेचा पोत सुधारण्याबरोबरच केसांचे सौंदर्य खुलवण्यासाठी कोरफडीचा उपयोग होतो. कोरफडीतील गरामुळे केस चमकदार आणि मुलायम होण्यास मदत होते. कोरफड ही केसांसाठी नैसर्गिक कंडिशनरप्रमाणे काम करते. पाहुयात केसांना कोरफड लावण्याचे नेमके काय फायदे आहेत...**

- नैसर्गिक कंडिशनर : कोरड्या आणि खराब झालेल्या केसांसाठी कोरफड अतिशय उपयुक्त असते. कोरफडीतील गर काढून तो पाण्यामध्ये योग्य पद्धतीने एकत्र करावा. हे मिश्रण स्प्रेच्या बाटलीमध्ये टाकावे. यामध्ये तेल मिक्स करावे. हे मिश्रण आवश्यकतेनुसार केसांवर योग्य पद्धतीने स्प्रे करा. असे काही वेळा केल्यानंतर तुम्हाला त्याचा नक्कीच चांगला परिणाम दिसून येईल.
- केसांची उत्तम वाढ : लांब केस सगळ्यांनाच आवडतात. लहान असल्यापासून मुलींना आपले केस लांबसडक असावेत असे वाटत असते. पण आहारातील हरवलेली मूल्ये, प्रदूषण यांमुळे केसांचे आरोग्य बिघडते आणि केस तुटण्याचे किंवा गळण्याचे प्रमाण वाढते. या समस्येसाठी कोरफडीची जेल अतिशय उपयुक्त असते. केसांचे आरोग्य टिकविण्यासाठी हा अतिशय उत्तम आणि नैसर्गिक उपाय आहे. कोरफडीची जेल लावल्याने केस वाढण्यास मदत होते.
- केस दिसतात मुलायम : कोरफडीमध्ये मुळातच एक प्रकारचा चिकटपणा असतो. कोरडे आणि प्राण गेलेल्या केसांना वंगण मिळणे आवश्यक असते. तेलामुळे केसांची मुळे बळकट होतात. तर कोरफड लावल्याने केसांचा पोत सुधारण्यास मदत होते. त्यामुळे चमकदार आणि मुलायम केसांसाठी कोरफडीचा वापर अवश्य करायला हवा.
- कोंड्यासाठी उपयुक्त : अनेकांना लहानपणापासून डोक्यात कोंडा होण्याचा त्रास असतो. कोंड्यामुळे डोक्यात खाज येणे, फोड होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. कोरड्या त्वचेमुळे हा त्रास उद्भवतो. केसांची मूळे कमकुवत झाल्यामुळेही कोंडा होतो. अशावेळी कोरफडीचा गर आणि तेल यांचे एकत्रित मिश्रण थोडेसे कोमट करावे. गार झाल्यानंतर हे मिश्रण हलक्या हाताने केसांना लावावे. तीन तासांनंतर कोमट पाण्याने केस धुवावेत. याचा कोंडा कमी होण्यास निश्चितच फायदा होतो.

## शॉर्ट न्यूज

### झोपेत असताना महिलेच्या दागिन्यांची चोरी

■ **सोनोशी :** येथील बाळुबाई दौंड यांच्याकडील दीड तोळ्याचे मिनी गंठण, पायातील पैंजण व जोडवे, असे दागिने चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. दौंड यांनी दोन चोरटे पळताना पाहिले, आरडाओरड केली. मात्र, अंधाराचा फायदा घेऊन चोरटे पळून गेले. या वेळी चोरटयांनी दीड तोळ्याचे मिनी गंठण, पायातील पैंजण व जोडवे, असे दागिने घेऊन पसार झाले. दौंड यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने शेतकरी कुटुंबासह घरासमोरच झोपत असतात. याचा फायदा घेऊन चोरटे चोरी करीत आहेत.

### बिबट्याचा मुक्त संचार, नागरिक भयभीत

■ **राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील माजी नगराध्यक्ष मुरलीधर कदम यांच्या देवळाली प्रवरा-गणेगाव रोडवर असलेल्या बंगल्या जवळ पहाटेच्या दरम्यान बिबट्या आला. बराच काळ हा बिबट्या परिसरात फिरत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आले. बिबट्याने पाळीव कुत्र्यावर हल्ला चढवून त्यास ठार केले आहे. गेटमधून आतमध्ये प्रवेश करून बिबट्या आतमध्ये मुक्तपणे फिरल्याचे यावेळी दिसून आले. या भागात बिबट्याचा वावर असल्याने वन विभागाने तातडीने पिंजरा लावावा. अशी मागणी माजी नगरसेवक अमोल कदम, संदीप कदम यांनी केली आहे.

### निळवंडे उजव्या कालव्यात बुडून एकाचा मृत्यू

■ **संगमनेर :** तालुक्यातील अंभोरे येथे अंभोरे डिग्रस रस्त्याच्यापुलाजवळ निळवंडे उजव्या कालव्यात बुडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. अंभोरे येथील उजव्या कालव्याच्या शेजारी राहत असलेल्या राधाकिसन विठोबा खेमनर (वय वर्ष ४३) हे रविवारी पाटाच्या कडेने आपल्या घराकडे जात असताना त्यांचा तोल जाऊन पाटाच्या पाण्यात पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### गोगलगावातील पाणी प्रश्न मार्गी

■ **नेवासा :** तालुक्यातील गोगलगाव हे गाव गोदावरी नदीकाठी आहे परंतु येथे एक महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत होती. विश्वास मते मित्रमंडळाने पाणीपुरवठा करून महिलांच्या डोक्यावरील उतरविण्याचे काम केले आहे. गोदावरी नदींचे पाणी पातळीत घट झाल्याने मे महिन्यात नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. गावातील वृद्ध, महिला, लहान बालके यांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. विश्वास मते यांनी सामाजिक प्रश्नाची जाण ठेवून त्यांनी महिलांची पायपीट थांबविली आहे.

### श्रीगोंदेतील वीज प्रश्नावर ठिय्या आंदोलन

■ **श्रीगोंदा :** शहरामध्ये अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे. शहरातील नागरिक, व्यापारी त्रस्त झाले आहेत. महावितरण कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यांचे मनमानी कारभार, बदल्या किंवा अनेक महत्वाच्या जागा रिक्त असल्यामुळे विजेचा लपंडाव सुरू असल्याने महावितरण कार्यालयाच्या अनागोंदी कारभारामुळे नागरीक त्रस्त झाले होते. म्हणून आज तहसील कार्यालयासमोर टिळक भोस, सतिष बोरुडे, विशाल सकट यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांनी सुरू केलेले ठिय्या आंदोलन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

# डोक्यावर पेटते कठे घेऊन बिरोबाला नवस

## कठयाच्या यात्रेमुळे गाव सर्वदूर प्रसिद्ध



**अकोले : प्रतिनिधी**

**तालुक्यातील कौठवाडी येथे अनेक वर्षांपासून परंपरागत भरणारी कठ्याची यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली. डोक्यावर मडके (कठे) घेतलेले भाविक, मडक्याला छिद्रे पाडून, मडक्यात उकळलेले तेल टाकून नवस फेडणारे व बोलणारे भाविक हे दृश्य रात्रीच्या अंधारात उठून दिसत होते. रात्रभर उत्साहात व पेटत्या कठ्यांच्या उजेडात परिसर उजळून काढणारी ही यात्रा पाहण्यासाठी, तसेच देवाला नवस बोलण्यासाठी राज्यभरातून भाविकांनी गर्दी केली होती.**

अकोले तालुक्यातील कौठवाडी गावात श्री बिरोबा देवाचे मंदिर आहे. कठ्याच्या यात्रेमुळे हे गाव सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे. यंदा देखील नगर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, धुळे, कल्याण, विदर्भातून लोकांनी येथे यात्रेसाठी गर्दी केली होती. कोणतेही काम पूर्ण होण्यासाठी देवाला 'कठा' लावून नवस बोलला जातो. हा नवस पूर्ण होत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. कठा म्हणजे मडक्याची घागर. मडक्याची वरची बाजू कापून त्यात खैर, साग, चंदन अशी विविध प्रकारची लाकडे व समिधा टाकून घागर पूर्ण भरतात. त्यात गोडेतेल टाकून चांगली भिजवतात. घागरीच्या चोहोबाजूंनी पांढरे शुभ्र कापड गुंडाळून, वरच्या टोकाला मंदिरासारखा आकार करतात. हे कठे बिरोबा मंदिरात ठेवतात. साकिरवाडी येथून ८ वाजता मानाची काठी येते व बिरोबा की जय अशा घोषात ढोल-ताशांच्या गजरात कठे पेटविले जाऊन यात्रेला सुरूवात होते.

मंदिराभोवती उघड्या अंगाने, डोक्यावरून संपूर्ण शरीरावर वाहत असलेले तेल, डोक्यावरचा अग्नी अशा वातावरणात हे दृश्य पाहणाऱ्यांच्या अंगाला काटा येतो. यंदा ७४ कठे पेटविले होते. भाविकांची संख्याही वाढत असल्याची माहिती अध्यक्ष दत्ता भोईर यांनी दिली. साकिरवाडी येथून मानाच्या काठीचे आगमन झाले. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर पेटलेले कठे आले. बिरोबा की जय म्हणत मंदिराभोवती पाच फेरे मारून भाविकांनी नवस फेडले. यावेळी अध्यक्ष दत्ता भोईर, सरपंच लता धादवड, उपसरपंच लता भोईर, राजेंद्र धादवड, शंकर साबळे, भरत धादवड, महेश भांगरे, विठ्ठल भोईर, ज्ञानदेव भांगरे आदिंसह यात्रा समिती व ग्रामस्थांनी नियोजन केले होते. तर राजूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पांडुरंग कावळे, शेख, पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

(पान १ वरून)

## मळगंगा विश्वस्त मंडळाची प्रथमच निवडणूक होणार!

**बिनविरोधसाठी प्रयत्न हवे होते** विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांनी गुप्त पध्दतीने मतदान घेण्याची मागणी केली असली तरी पुन्हा ग्रामसभा घेऊन बिनविरोध निवड करण्याबाबत विचार विनिमय करणे आवश्यक होते अशी भूमिका निवडणूक जाहिर झाल्यानंतर काही सभासदांकडून देण्यात आली.

**ट्रस्टलाच आर्थिक भुर्दंड बसणार !**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची निवडणूक ही २१ जागांसाठी होत असून आज पहिल्याच दिवशी २६ सभासदांनी उमेदवारी अर्ज नेले आहेत या माध्यमातून २६०० रुपये ट्रस्ट तिजोरीत आले असले तरी निवडणूक खर्च विचारात घेता. ही निवडणूक म्हणजे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला मोठा आर्थिक भुर्दंड आहे. मुठभर सभासदांचे मत विचारात घेता निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली पाहिजे यानुसार ही निवडणूक घेण्याची घाई काही खुर्चीची अभिलाषा ठेवणाऱ्या युवा पुढाऱ्यांनी केली आहे. देणगीचा ओघ राज्यातून असतो गेली चाळीस पंचेचाळीस वर्षात काही कोटीची देणगी जमा झाली यातून लोकसहभागातून विकासकामे झाली यामध्ये सर्वाधिक योगदान देणगीदात्यांचे आहे. निवडणूकीचा खरा भुर्दंड देणगीदात्यांना बसणार असून आम्ही राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवी आणि मंदिर परिसर विकासासाठी देणगी दिली असून निवडणुकीसाठी नाही अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

## बारावीच्या परीक्षेत यंदाही मुलींचीच बाजी !

वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

गोसावी म्हणाले, की बारावीची सहा माध्यमांतील १५४ विषयांची परीक्षा घेण्यात आली. अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाइन घेतल्यामुळे निकाल लवकर जाहीर होण्यास मदत झाली. गैरप्रकारांची संख्या घटली. राज्यस्तरावर २७१ भरारी पथके नेमण्यात आली होती, तसेच जिल्हा स्तरावरही स्वतंत्र भरारी पथके नियुक्त करण्यात आली होती.

## ..... बैलांचा बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग नको

आणि औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण याची नोंद ठेवण्यात येते.पशुधनाचे प्रजनन, त्याचा मालक,जन्म-मृत्यू,आजार, त्यावर केलेले उपचार आदींची माहिती ठेवण्यात येते. जनावरांच्या कानाला लावण्यात आलेल्या या इअर टॅगची नोंद भारत सरकारकडे असते. बाजार समिती आठवडी बाजार खरेदी विक्री संघ यांनी इतर पशुधनाची ही विक्री करताना टॅग दिलाय का? यावर लक्ष द्यावे नसेल तर बंदी घालावी असं सांगण्यात आले. एक जूनपासून इअर टॅग बंधनकारक असल्याचे शासनानेही परिपत्रक काढले. मात्र, बैलांच्या कानाला टॅग मारण्यास बैलगाडा मालकांनी विरोध केलाय.बैलाच्या कानाला टॅग मारल्यास त्याचा परिणाम बैलाच्या धावण्यावर होऊ शकतो. त्यामुळे शासकीय नियमाने बैलाच्या गळ्यात टॅग लावू मात्र कानाला टॅग मारणार नाही अशी भूमिका बैलगाडा मालकांनी घेतली.

**बैलांच्या टॅग मारण्याला बैलगाडा मालकांचा विरोध**

बैलगाडा शर्यतीचा बैल हा खिल्लार जातीचा असतो. बैलांची ही जात चपळ आणि तेज नजरेचा असते शर्यतीवेळी हा बैल कान वर करुन नजर लावुन धावतो त्यामुळे बैलाच्या कानाला टॅगिन केलास त्याचा थेट परिणाम बैलाच्या धालण्यावर होतो त्यामुळे बैलाच्या टॅगला विरोध नाही मात्र बैलाच्या कानाला टॅग मारण्यासाठी विरोध असून शासकिय नियमाने बैलाच्या गळ्यात टॅग लावु अशी थेट भुमिका बैलगाडा मालकांनी घेतली आहे.

संदिप बोदगे
अध्यक्ष अखिल भारतीय बैलगाडा संघटना ( महाराष्ट्र राज्य)

## ६ जूनपर्यंत आरक्षण द्या अन्यथा..

आता सगळा मराठा एकवटला आहे. ६ जून पर्यंत सरकारने आरक्षण द्यावं ते झालं नाही तर आंदोलन बंद करणार नाही. कठोर आमरण उपोषण होणार असा इशारा मनोज जरांगेनी दिला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यापूर्वी माध्यमांशी बोलत असताना मनोज जरांगेंनी त्यांची भूमिका स्पष्ट केली तसंच सरकारला त्यांनी मुदत दिली आहे. मागच्या चार दिवसांपासून गाडखेडा परिसरातील गॅलेक्सी रुग्णालयात मनोज जरांगे उपचार घेत होते. त्यांची प्रकृती सुधारल्याने त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर ते आंतरवली सराटीला गेले. त्याआधी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

नेते जातीवाद करायचा नाही म्हणतात आणि

"अनेक नेते जातीवाद करायचा नाही म्हणतात, कॅमेरासमोर गोड बोलतात. पण प्रत्यक्षात कृती काहीही होत नाही. तरीही आम्ही मराठा बांधवांना शांत राहण्यास सांगितलं आहे. कोण काय कावे करतं आहे त्यावर बारीक लक्ष ठेवा आणि नंतर तुमची भूमिका मांडा. ४ जूनला आमरण उपोषण सुरु होणार आहे. आपल्याला या नेत्यांमध्ये कोण जिंकलं? कुणाच्या अंगावर गुलाल पडला याचा आनंद नाही. तर आरक्षणाच्या गुलालात आपल्याला रस आहे." असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.

मराठा समाज शांत आहे पण लक्षपूर्वक सगळं पाहतो आहे

"जे कुणी मुद्दाम डिवचत आहेत त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. जातीय तेढ नेत्यांना निर्माण करायची आहे मराठा समाजाला नाही. मात्र मी मराठा समाजाला शांत राहण्याचं आवाहन केलं आहे आणि मराठा समाज शांत आहे. एकीकडे नेते आम्हाला सांगतात की जातीयवाद करु नका. पण जातीयवाद न करण्याची जबाबदारी एकट्या मराठा समाजाची नाही. जर सरकारने ऐकलं नाही तर मराठा समाजाला सत्तेत घुसावं लागेल. सत्ता काबीज करावी लागेल मग सगळ्या गोष्टी आपोआप होतील असंही मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. काही नेत्यांना जातीयवाद दूर करायचाच नाही. आवाहनही करत नाहीत की कुणी जातीयवाद करु नका" असंही मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.

# आठवणीतील शेवगाव या ग्रंथाचे प्रकाशन संपन्न

## इतिहास जागविण्याचा प्रयत्न गौरवास्पद



**शेवगाव : प्रतिनिधी**

**येथील सिद्धहस्त लेखिका डॉ.मेधा कांबळे यांनी आठवणीतील शेवगाव या ग्रंथातून शेवगाव परिसराचा इतिहास जागविण्याचा केलेला प्रयत्न निश्चीत गौरवास्पद आहे.हा ग्रंथ म्हणजे प्रति वास्तविक इतिहास(काऊंटर फॅक्चयुअल हिस्ट्री) या नविन प्रकाराची अनुभूती आहे.असे प्रतिपादन राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्रा डॉ सदानंद मोरे यांनी केले.**

डॉ मेधा कांबळे यांनी लिहिलेल्या आठवणीतील शेवगाव या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा डॉ. मोरे यांचे अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त शिक्षण आयुक्त डॉ पुरुषोत्तम भापकर यांचे हस्ते प्रसिद्ध कवि व डॉ कैलास दौंड, जि .प .च्या माजी अध्यक्षा सौ राजश्री घुले, मा जि प सदस्या हर्षदा काकडे,ज्येष्ठ नेते बापूसाहेब भोसले, सेवानिवृत्त प्राचार्य शिवाजीराव देवढे, प्राचार्य डॉ पुरुषोत्तम कुंदे व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

डॉ .भापकर यांनी इतिहास लेखन सोपे नसते.त्याला कल्पनेची जोड देता येत नाही. प्रत्येक घटना त्यातील संदर्भ पडताळून पहावे लागतात लेखिका डॉ कांबळे यांनी हे शिवधनुष्य लिलया पेलले आहे.अशा शब्दात गौरव करून हा ग्रंथ परिसरातील सर्वांना प्रेरणा दायक ठरेल अशा शुभेच्छा दिल्या.

लेखिका डॉ कांबळे म्हणाल्या की, प्रत्येक गावचा एक इतिहास असतो.शेवगाव शहरातील गेल्या शंभर वर्षातील सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,राजकीय,क्रीडा आदि विविध क्षेत्रातील सर्वांगीण विकास व बदल तसेच विविध मान्यवरांच्या कामगिरीची माहिती घेऊन तालुक्यातील ज्येष्ठासह आजच्या युवकांना ग्रंथातून परिपूर्ण माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे स्पष्ट करून त्यासाठी दोन वर्षे अनेकांकडून अविरत माहिती व संदर्भ संकलित करून आठवणीतील शेवगाव या ग्रंथाला आकार दिल्याचे नमुद केले.

यावेळी सौ.सुरेखा मोरे, माजी जि .प सदस्य योगिता राजळे, श्रीरामपूरच्या माजी सभापती सुनिता गायकवाड , शिवशांकर राजळे,काकासाहेब नरवडे, संजय कोळगे,पद्मा पाठक,ॲड सुभाष लांडे,युवराज नरवडे,श्रीहरि वारकरी,संजय फडके,डॉ भाऊसाहेब लांडे पाटील,श्रीमंत घुले, प्रकाशक लक्ष्मण झिंजुर्के,डॉ अशोक देशमुख,ॲड कारभारी गलांडे , बबनराव भुसारी, अंबादास कळमकर,डॉ बहाउद्दीन काझी,वजीर पठाण, शब्बीर शेख,प्रा परशुराम गणगे,हरिश्चंद्र नजन यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

अरिस्टंट कमांडन्ट नरेंद्र गच्ची यांनी सर्वांचे स्वागत केले.प्रा विजया मते यांनी सुत्रसंचलन केले तर दीक्षा गच्ची यांनी आभार मानले, कार्यक्रमास मोठ्या संख्नेने नागरिक उपस्थित होते.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडवान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र हॉस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राउंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# वृक्षतोडीविरोधात शिरसुले ग्रामस्थ आंदोलन करणार

## जलशुध्दीकरण प्रकल्पाची जागा बदलण्याची मागणी

शिरसुले : प्रतिनिधी

**शिरसुले ग्रामस्थांनी लोकसहभागातून संगोपन केलेल्या झाडांची कत्तल करून त्या जागेवर जलशुध्दीकरण प्रकल्प राबविण्याचा घाट घातला जात असून या बेकायदेशीर वृक्षतोडीविरोधात शिरसुले ग्रामस्थ आंदोलन करणार आहेत.**

शिरसुले येथे जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आल्यानंतर त्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यताही दिली. त्यानंतर ग्रामस्थाच्या वतीने जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्याकडे पत्रव्यवहार करून शिरसुले येथील गट क्र.१४३ मध्ये मोठया प्रमाणावर वृक्ष असून प्रस्तावित जलशुध्दीकरण प्रकल्प दुसऱ्या जागेत उभारून वनसंपदेचे जतन करण्याची मागणी केली आहे.

बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचे संतुलन बिघडले असून अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. तापमानातही मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यावर मात करण्यासाठी शिरसुले ग्रामस्थांनी गट क्र.१४३ मध्ये ८२० झाडांचे संगोपन करून ही झाडे वाढविली आहेत. वनसंपदेमुळे या भागात भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर, लांडोरांची संख्याही मोठया संख्येने येथे पहावयास मिळते.



■ जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यासाठी शिरसुले येथील ८२० झाडांची कत्तल करण्याचा घाट घातला जात आहे.

जलशुध्दीकरण प्रकल्पास जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता दिली असली तरी वनविभागाने परवानगी नाकारल्याने वृक्षतोडीसाठी पोलीस अधिक्षकांनी संरक्षण नाकारले आहे. तर जलसंपदा विभागानेही पाणी पुरवठयास नकार दिला आहे. असे असताना ग्रामपंचायतमार्फत प्रशासनावर राजकीय दबाव आणून हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### रस्ता रोको आणि उपोषण

यापुढील काळात विना परवानगी वृक्षतोड करण्याचा प्रयत्न झाल्यास निघोज ते देवीभोयरे फाटा या मुख्य रस्त्यावर शिरसुले फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून काही ग्रामस्थ वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या पारनेर येथील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

### विकास हवा, मात्र निसर्गाची हानी नको

विविध योजना राबवून विकास जरूर हवा मात्र निसर्गाची हानी करून नाही, अशी भूमिका शिरसुले ग्रामस्थांनी घेतली असून स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामसभेत वृक्षतोडीस विरोध दर्शवूनही कोणाचाही विरोध नाही असा खोटा ठराव निघोज ग्रामपंचायतीने केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या ठिकाणच्या ८२० झाडांची कत्तल करण्याचा दुसरा प्रयत्न ग्रामस्थांनी फेटाळला असल्याचे शिरसुले ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# पारनेर पब्लिक स्कुलचा १०० टक्के निकाल!

■ बारावीचा निकाल जाहीर | सिध्दी भालेकर पहिली
■ शत प्रतिशत निकालाची परंपरा यंदाही कायम

पारनेर : प्रतिनिधी

**डांगेज पॅटर्न अंतर्गत पारनेर येथील पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या १०० टक्के विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन करीत शत प्रतिशत निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहिर करण्यात आला. या परीक्षेत अपेक्षेप्रमाणे पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. संस्थेने स्थापनेपासून १०० टक्के निकालाची परंपरा जपली असल्याचे संस्थेचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले.



या परीक्षेत संस्थेच्या सिध्दी शंभुनाथ भालेकर या विद्यार्थीनीने ९०.१७ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. पायल संदीप गट हिने ९० टक्के गुण मिळवून दुसरे तर अथर्व जांबुवंत शिंदे याने ८७.३३ टक्के गुण मिळवत विद्यालयात तिसरे स्थान पटकाविले. संस्थेच्या एकूण ६० विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. सर्व विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले. त्यापैकी ११ विद्यार्थ्यांनी ८० टक्के व त्याहून अधिक गुण संपादन करीत संस्थेच्या शिक्षणाचा दर्जा अधोरेखीत केला.

पद्मभुषण अण्णासाहेब हजारे, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, प्राचार्य गितराम म्हस्के, डांगेज पॅटर्नचे अध्यक्ष ज्ञानेश डांगे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना शंभुनाथ भालेकर, सचिन वाघ, आझाद कुशवाह, विक्रम गाडगे, ज्ञानेश्वर भांड, रोहिदास वळसे, पंकज साताळकर, शिरीष कुलकर्णी, गणेश दुधाडे, प्रशांत साळवे यांनी मार्गदर्शन केले.

# वादळी वाऱ्याने कोळगाव परिसरातील अनेक संसार उघड्यावर

■ अवकाळी पावसाने मोठे नुकसान ■ बहुतांशी पिके जमीनदोस्त





श्रीगोंदा : प्रतिनिधी

**तालुक्यातील कोळगाव परिसरात मागील दोन दिवसात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी झाडे, महावितरणचे खांब उन्मळून पडले आहेत. तर कोळगाव परिसरातील अनेकांच्या घराचे पत्रे उडून गेल्याने संसार उघड्यावर आले आहेत. यात प्रशांत गुंजाळ या तरुणाच्या अंगावर घराची भिंत पडल्याने तो जखमी झाला आहे.**

कोळगाव परिसरात रविवारी (ता.१९) व सोमवारी (ता.२०) सलग दोन दिवस झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले आहे. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसात गुंजाळ मळा, जगताप मळा, बेंदवस्ती, मानमोडी, तनपिरे मळा, वाघेरखेलवाडी परिसरातील बिठाबाई साबळे, अनिल काळे, वैभव नलगे, नंदू शामराव लगड, गणेश शाहजी निंबाळकर, संतोष गुरव, हरी दत्तात्रय गुंजाळ, विलास गुंजाळ, बाळासाहेब गुंजाळ, विजय गुंजाळ, विठ्ठल गुंजाळ, बापू गुंजाळ, संभाजी गुंजाळ, कैलास गुंजाळ, राजू गुंजाळ, मोहन जगताप यांच्या घराचे पत्रे उडून गेले. तर शरद धोत्रे आणि बापू दत्तात्रय गुंजाळ यांच्या घराचे पत्रे उडून जात घराची भिंत पडली. यात बापू गुंजाळ यांचा मुलगा प्रशांत गुंजाळ या तरुणाच्या अंगावर घराची भिंत पडल्याने तो जखमी झाला आहे.

जोरदार वादळी वाऱ्यात घराचे पत्रे उडून गेल्याने घरातील अन्न-धान्य भिजून मोठे नुकसान होऊन अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. यात जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी महावितरणचे खांब उन्मळून पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला. तर कोळगाव परिसरातील पांडुरंग मेहेत्रे यांच्या शेततळ्याचा कागद फाटल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. तर माजी उपसरपंच अमित लगड यांच्या हॉटेलचा रस्त्याच्या कडेला असलेल्या एलईडी बोर्ड जोरदार वाऱ्यामुळे जमीनदोस्त होऊन मोठे नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे बहुतांश पिके जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# निघोजमध्ये ११ हजार जनावरांचे लसीकरण होणार

■ पशुसंवर्धन विभागाची मोहिम ■ लम्पी, पीपीआर आजारांबाबत जनजागृतीही करणार

निघोज : प्रतिनिधी

**पावसाळयाच्या पार्श्वभुमीवर जनावरांना होणाऱ्या संभाव्य लम्पी तसेच पीपीआर आजारांबाबत पशुसंवर्धन विभाग सतर्क झाजला असून निघोज पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कक्षेत येणाऱ्या ११ हजार ३९७ जनावरांच्या लसीकरणाची मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान या आजारांबाबत पशुपालकांमध्ये जनजागृतीही करण्यात येणार आहे.**

गेल्या वर्षी लम्पी आजाराने थैमान घातले होते. अनेक जनावरे या आजरामुळे दगावली होती. त्यात पशुपालकांना मोठा आर्थिक फटका बसला. या पार्श्वभुमीवर पशुसंवर्धन विभागाने यंदा खबरदारी घेतली असून विविध जनावरे, शेळया, मेंढयांच्या लसीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली आहे. जनावरांसाठी लम्पी तर शेळया, मेंढयांसाठी पीपीआर आजाराच्या लस देण्यात येत आहेत.

पशुधन विकास अधिकारी, पर्यवेक्षक तसेच कर्मचाऱ्यांच्या मदतीने लसीकरण मोहिम राबविण्यात येत असून गावागावांत, वाडया, वस्त्यांवर जाऊन हे लसीकरण करण्यात येत आहे.

कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रात येत असलेल्या या भागातील नागरीक मुख्यत: शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शेतीला जोड धंदा म्हणून दुग्ध व्यवसाय मोठया प्रमाणावर करण्यात येतो. शेतीसाठी, जनावरांच्या चाऱ्यासाठी पाण्याचा शास्वत स्त्रोत उपलब्ध असल्याने जनवरांची संख्या या भागात मोठी आहे. त्यामुळे पावसाळयापूर्वीच मे महिन्यात लसीकरण हाती घेण्यात आले आहे. पावसाळयात जनावरांमधील आजारांचे प्रमाण अधिक असल्याने रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठीही लसीकरण करण्यात येत आहे.



■ निघोज परीसरात पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांच्या लसीकरणाची मोहिम हाती घेण्यात आली आहे.

### गाडयाच्या बैलांनाही टॅगिंग करावे

लाखो रूपयांची दौलत दावणीला असणाऱ्या गाडा मालकांनीही आपल्या सर्जा राजाला टॅगिंक करून घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. लसीकरण, शासकीय सेवा, शासकीय मदत, जनावरांची खरेदी विक्री यासाठी टॅगिंग आवष्यक असून टॅगिंग केलेल्या जनावरांची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

# सेवानिवृत्तीबद्दल हभप दळवी सर यांचा सत्कार

## कडूस येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



(छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील कडूस येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर येथे सहाव्या वर्धापन अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभ प्रसंगी ह. भ. प. दळवी सर यांचा रावडे परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सौ. सुरेखा व आप्पासाहेब रावडे सर यांनी हभप दळवी सर यांचा हार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.**

कडूस येथे विठ्ठल रूक्मिणी मंदिरात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. गेली सात दिवस कथेचे आयोजन करण्यात आले यादरम्यान परिसरातील भाविकांनी कथेचा लाभ घेतला. समाप्तीच्या दिवशी ह. भ. प. दळवी सर यांची काल्याची किर्तन सेवा संपन्न झाली. नियत वयोमानानुसार ते ३१/५/२०२४ रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्त आप्पासाहेब रावडे यांनी त्यांचा सपत्नीक सत्कार केला. यादरम्यान रावडे परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सरपंच मनोज मुंगसे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती तालुकाध्यक्ष पुनमताई मुंगसे, प्राचार्य बाळासाहेब करंजुले, बी. के.दिवटे यांच्यासह पंचक्रोशीतील सकल भाविक भक्त सर्व ग्रामस्थ व महिला भगिनी, कावडी मंडळ व तरुण मंडळ, टाळकरी माळकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आबासाहेब गाडगे यांचे निधन

## कडक शिस्तीचा हाडाचा शिक्षक हरपला

पारनेर : प्रतिनिधी



**जुन्या काळात बीएससी बीएड झालेले आबासाहेब विश्वनाथ गाडगे यांचे मंगळवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे कडक शिस्तीचा हाडाचा शिक्षक हरपल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. उद्योजक प्रमोद व गोपी गाडगे तसेच शिक्षिका मनिषा गाडगे-तांबे यांचे ते वडील होत.**

जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेमध्ये शिक्षक म्हणून काम करताना स्व. आबासाहेब यांनी अनेक पिढया घडविल्या. कडक शिस्तीच्या गाडगे सरांचा विद्यार्थ्यांमध्ये आदरयुक्त दरारा होता. त्यांनी मार्गदर्शन केलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्चपदस्थ अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

२७ ऑक्टोबर १९४७ मध्ये जन्मलेल्या स्व. आबासाहेब यांनी पारनेरच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक, नगरच्या दादा चौधरी विद्यालयात माध्यमिक, रेसिडेन्सीयल हायस्कुलमध्ये उच्च माध्यमिक तर नगरच्याच न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये विज्ञान शाखेची पदवी तर श्रीरामपुरच्या मॉडर्न कॉलेजमधून बीएडची पदवी प्राप्त केली.


वर्षभर पारनेरच्या सेनापती बापट विद्यालयात शिक्षकाची नोकरी केल्यानंतर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेत ते देवळालीप्रवरा येथे रूजू झाले. पुढे नारायणडोह, गोरेगांव व पारनेर येथे प्रदीर्घ अध्यापन करून त्यांनी १९९६ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतली.

कर्तुत्ववान व्यक्तीमत्व म्हणून ओळख असेलेल्या स्व. आबासाहेब यांनी वडीलांच्या पश्चात बहिण भावांच्या संगोपनाबरोबच त्यांच्या विवाहाची जबाबदारीही पार पाडली. स्वत:च्या दोन्ही मुलांना उद्योगात उभे करतानाच मुलीस उच्च शिक्षण देत स्वत:चा शिक्षकाचा वारसा पुढे नेण्यासाठी शिक्षकाच्या नोकरीत रूजू केले. त्यांचे जावई देखील उच्च शिक्षित असून रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून ते कार्यरत आहेत.

कै. आबासाहेब यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परीवार आहे. पारनेर येथील स्मशानभुमीत मंगळवारी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य साधनांचे वितरण

■ ९८ विद्यार्थ्यांना मिळाला लाभ
■ गटशिक्षणाधिकारी सीमा राणे यांच्या हस्ते वाटप



सुपा : प्रतिनिधी

**पारनेर पंचायत समिती समावेशित शिक्षण विभागा मार्फत ९८ दिव्यांग विद्यार्थ्यांना यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी होमबेस कीट , गरजेनुरूप साहित्य साधने गटाशिक्षणाधिकारी सीमा राणे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.**

या वेळी शिक्षणविस्तार अधिकारी केसकर, केंद्रप्रमुख विनेश लाळगे, दौलत येवले व सर्व समावेशित टिम उपस्थित होती.गृहमार्गदर्शनातील ५१ दिवांग विदयार्थ्यांना होमबेस कीट , तसेच ४७ दिव्यांग विद्यार्थांसाठी व्हिलचेअर , रोलेटर , सिपीचेअर , कॅलीपर बुट , कमोड मॉडी फॉय चेअर वितरण करण्यात आले. समावेशित शिक्षणांतर्गत ७८ दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमित सोमवार व गुरूवार मोफत फिजिओथेरपी ही फिजिओ थेरपीस्ट द्वारे देण्यात येत हे सांगण्यात आले.

४३२ दिव्यांग प्रमाणपत्र मोफत देवून तालुकास्तरावर राष्ट्रीय बाल स्वास्थ अंतर्गत तपासणी करून टंगटाय २२, वलॅपट प्लॅट २ , अस्थींव्यंग ३ , नेत्रदोष ६ व इतर ५ असे मिळून ३८ शस्त्रक्रिया व ४२ विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात आले.त्याच प्रमाणे दिव्यांग विद्यार्थांना साह्यभूत सेवासुविधामध्ये मदतनिसभत्ता , प्रवासभत्ता , प्रोत्साहन भत्ता, वाचक भतता ३० लाख १८ हजार ४५ रूपयेचे अनुदान पालकाच्या खात्यावर पीएफएमएस द्वारे वर्ग केलेबाबत सांगण्यात आले.

या तालुक्यात ८६९ दिव्यांग विद्यार्थ्यांना ६ विशेष शिक्षक व ३ विशेष तज्ञ मार्फत अध्ययन अध्यापन केले जाते असे दत्तात्रय आंबेकर यांनी सांगितले.प्रशांत वाळुंज यांनी उपस्थित पालक व विद्यार्थी यांचे आभार व्यक्त केले.

# काहीतरी चुकतंय का? ला दुसरे पारितोषिक

## साईबन बालपण आनंदउत्सव स्पर्धा संपन्न



नगर : प्रतिनिधी

**येथील एस के एन्टरटेनमेंट थिएटर ग्रुपने सादर केलेल्या काहीतरी चुकतंय का? नाटिकेला दुसरे पारितोषिक साईबन दुसरे बालपण आनंद उत्सव स्पर्धा मध्ये मिळाले आहे.**

मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित देशातील पहिल्या साईबन बालपण आनंदउत्सव स्पर्धा २०२४ थाटामाटात संपन्न झाल्या.यामध्ये वय वर्षे ५५ च्या पुढील व्यक्तींनी मन:शांतीचा मार्ग कौटुंबिक एकतेतून जातो यावर आपली कला सादर करावयाची होती ५५ वयानंतर दुसरे बालपण सुरू होते.म्हणून हि स्पर्धा प्रथमच घेण्यात आली होती.

ज्येष्ठ रंगमकर्मी प्रा.मधुसुदन मुळे,पी. डी. कुलकर्णी यांच्या हस्ते काहीतरी चुकतंय का ? च्या कलाकारांनी दुसरे पारितोषिक स्वीकारले यामध्ये कलाकार सुफी सय्यद,राम ढुमणे,चंद्रकांत जाधव,मेघमाला पठारे,लेखक चंद्रशेखर जोशी,दिग्दर्शक अय्युब खान,निर्मिती प्रमुख सुभाष काळे,संगीत जयंत चौसाळकर व अजित सिंग अमर,तसेच रंगकर्मी बलभीम पठारे उपस्थित होते तर व्यासपीठावर परीक्षक जयंत येलूलकर, वर्षाताई पंडित,डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया, सदाशीव मोहिते,नंदकुमार देशपांडे,चंद्रकांत पंडित उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com